**न्यायचौकशी विरहीत कि. अर्ज क्र. ०१/२०१८ मधील नि. क्र. ०१ येथील आदेश**

अर्जदार यानी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रीया संहीता १९०८ चे कलम १५२ प्रमाणे नियमीत दिवाणी दावा क्र.१२९/२०१४ (रामा उर्फ रामचंद्र आलदर–विरुध्द–मारुती आलदार व इतर) मधील हुकूमनाम्याच्या तडजोड पुरसीस मधील परिच्छेद क्र. ६ मध्ये गट क्र. ४२१/४ चे अनुषंगाने नमूद केलेल्या ' दक्षिणेकडे ०हे –१८.३ आर, पो.ख. ०हे –०४ आर' ऐवजी ' दक्षिणेकडे ० हे–१६.३ आर, पो.ख. ०हे–०६ आर' अशी दुरुस्ती करणेकामी दाखल केला आहे.

प्रस्तुत अर्ज, अर्जावरील नि.क्र.८ येथील जाबदेणार यांचे म्हणणे वाचले. अर्जातील कथनांचे पृष्टयर्थ अर्जदार रामा उर्फ रामचंद्र आलदर यानी नि.क्र. ९ येथे शपथपत्र सादर करुन नमूद केले आहे की, सदर हुकूमनाम्याचे तडजोडीमध्ये अंकगणीतीय चुक झाली आहे व त्यामुळे वरील प्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. जाबदेणार यांनी अर्जातील सर्व मजकूर मान्य केला आहे. त्यानी अर्जास व अर्जदार यांचे पुराव्यास हरकत घेतलेली नाही. अर्जदार यानी नि. क्र. १४ येथे नियमीत दिवाणी दावा क्र. १२९/२०१४ मधील हुकूमनाम्याची प्रमाणीत प्रत व नि. क्र. १२ व १३ येथे तडजोड पुरसीस व वादपत्राची प्रमाणीत प्रती सादर केल्या आहेत. सर्व बाबींचे अवलोकन करता सदर हुकूमनाम्यासोबतच्या तडजोडीमध्ये सदरील अंकगणीतीय चुक झाल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे दिवाणी प्रक्रीया संहीता १९८० चे कलम १५२ अन्वये नियमीत दिवाणी दावा क्र. १२९/२०१४ च्या हुकूमनाम्याचे तडजोडीमध्ये तशी दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित ठरेल. सबब, मी न्यायाचे दृष्टीने खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे. .

## आदेश

१. प्रस्तूचा अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. नियमीत दिवाणी दावा क्र. १२९/२०१४ (रामा उर्फ रामचंद्र आलदर –विरुध्द– मारुती आलदार व इतर) च्या हुकूमनाम्याच्या तडजोडी मधील परिच्छेद क्र. ६ मध्ये जमीन गट क्र. ४२१/४ चे अनुषंगाने 'दक्षिणेकडे ०हे–१८.३ आर, पो.ख. ०हे–०४आर' ऐवजी 'दक्षिणेकडे ०हे–१६.३ आर, पो.ख. ०हे–०६आर' अशी दुरुस्ती करण्यास अर्जदार याना परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

४. प्रस्तूतच्या आदेशाचे निवेदन खुल्या न्यायासनासमोर अधिघोषीत केले.

**(सचिन स.पाटील)**

दिनांकः ३० .०१.२०१९ **दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, सांगोला**

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kotkunde A.R. |
| (b) | Court | : | Shri. S.S. Patil,<br>Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 30.01.2019 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 30.01.2019 |